संपादकीय...

उत्तर प्रदेशात त्सुनामी

राज्य विधानसभांच्या निवडणुकांची ताजी फेरी जवळजवळ महिनाभर गाजत होती. पण तिची सांगता भाजपाच्या एवढ्या मोठ्या त्सुनामी लाटेने होईल अशी कोणाचीच अपेक्षा नव्हती. निवडणुका लढवणारे राजकीय पक्ष आपली ताकद कितीही कमी असली तरी तिच्या मानाने अधिक विजयाची अपेक्षा करत असतात. परंतु भारतीय जनता पार्टीला अशा आतिशयोक्त अपेक्षेपेक्षासुध्दा चांगले यश मिळाले आहे. वेगळ्या शब्दात सांगायचे तर एखाद्या विद्यार्थ्याने ६० टक्के मार्कांसाठी म्हणून कसून अभ्यास करावा पण त्याला प्रत्यक्षात ८० टक्के मार्क मिळावेत त्यामुळे त्याच्यावर स्वतःच्या यशामुळे चकित होण्याची पाळी यावी तशी काहीशी अवस्था भारतीय जनता पार्टीची निदान उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड या दोन राज्यांच्या बाबतीत नक्कीच झालेली आहे. उत्तराखंडात भाजपाला आपले सरकार येईल असे वाटले होते परंतु ७० जागांपैकी ५७ जागांवर आपल्याला विजय मिळेल असे भाजपा नेत्यांना स्वप्नातसुध्दा वाटत नव्हते. तिच गत उत्तर प्रदेशाची. एकूण ४०३ जागांपैकी २०० ते २१० जागा मिळाल्या तर किती बहार होईल अशी स्वप्ने भाजपाचे नेते पहात होते. परंतु प्रत्यक्षात त्यांना ३२५ जागा मिळाल्या. पंजाबमध्ये मात्र भाजपाच्या बाबतीत नेमकी उलटी स्थिती निर्माण झाली. मात्र तिथे भाजपाचा झालेला पराभव हा थेट भाजपाचा नसल्यामुळे भाजपाच्या दृष्टीने तरी पंजाबचा निकाल नामुष्कीचा आहे असे म्हणता येत नाही. तिथे भारतीय जनता पार्टी ही काही सत्ताधारी आघाडीतली मुख्य पार्टी नव्हती. असे असले तरी तिथे भाजपाच्या हाती भोपळा पडावा हे भाजपाच्या दृष्टीने नामुष्कीची गोष्ट आहे. गोवा आणि मणिपूरमधील निकालांना राष्ट्रीयदृष्ट्या मोठे महत्व नाही. परंतु मणिपूरमध्ये भाजपाने पूर्वी एकही जागा हाती नसताना २१ जागांवर विजय मिळवला. हे भाजपासाठी कौतुकास्पदच आहे. गोव्यात मात्र भाजपाला सत्ता गमवावी लागली आहे. आता बहुमताची गोळाबेरीज करण्यासाठी तिकडमबाजी केली जाईल. परंतु पराभव तो पराभवच. पक्षातील मतभेद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाती नाराजी, शिवसेनेची लूडबूड आणि आम आदमी पार्टीचा गोव्याच्या राजकारणात झालेला प्रवेश या घटकांचा परिणाम भाजपाला नक्कीच भोगावा लागला आहे. त्यातल्या त्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील फूट संघ परिवारासाठी क्लेशदायक आहे. या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशात भाजपाला मिळालेल्या ३२५ जागा या पक्षाला मोठा दिलासा देणार्या आणि इतर अनेकांना अनेक प्रकारचे इशारे देणार्या आहेत. देशातले सर्वात मोठे राज्य म्हणून उत्तर प्रदेशाच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते आणि त्या अर्थाने उत्तर प्रदेशाच्या या निकालाचा देशाच्या राजकारणावर काय परिणाम होणार आहे यावर खूप चर्चा जारी आहे. परंतु या परिणामांचे काही पैलू अद्याप समोर आले नाहीत. त्यावर प्रकाश टाकण्याची गरज आहे. भाजपाचे ३२५ आमदार उत्तर प्रदेशात, ५७ आमदार उत्तराखंडात आणि २१ आमदार मणिपूरमध्ये निवडून आले आहेत. त्याचा परिणाम राज्यसभेच्या पक्षीयय बलाबलावर होणार आहे. कारण येत्या वर्षभरात उत्तर प्रदेशातून राज्यसभेवर दहा खासदारांची निवड केली जाणार आहे आणि ते खासदार भाजपातून निवडून आले की राज्यसभेतली भाजपाची ताकद वाढणार आहे. संसदेत कोणतेही विधेयक मंजूर करून घेताना भाजपाला राज्यसभेत बहुमत नसण्याची अडचण आडवी येते. त्यामुळे एखाद्या विधेयकाला राज्यसभेची मंजुरी घेताना काँग्रेसच्या किंवा अण्णा द्रमुकच्या नाकदुर्या काढाव्या लागतात. परिणामी कोणतीही विधेयके मंजूर करून घेण्याचा वेग कमी होतो. जीएसटी विधेयकाच्या बाबतीत तशी अडचण आली होती. जो जीएसटी कायदा जून २०१६ मध्ये लागू होणे अपेक्षित होते तो कायदा आता सप्टेंबर २०१७ पासून लागू होणार आहे. राज्यसभेत भाजपाची संख्या कमी असल्यामुळे हे घडले. आता मात्र राज्यसभेतही भाजपाचेच वर्चस्व निर्माण झाले तर अनेक महत्त्वाची विधेयके वेगाने मंजूर व्हायला लागतील आणि सरकारला आपल्या आर्थिक सुधारणा कार्यक्रमांचा वेग वाढवता येईल. येत्या जुलैमध्ये राष्ट्रपतींची निवडणूक आहे. परंतु ती निवडणूक सहजपणे जिंकता यावी एवढे संख्याबळ भाजपाच्या हातात नव्हते. उत्तर प्रदेशामुळे ते आता भाजपाला प्राप्त झाले आहे. तेव्हा आपल्या मनचा राष्ट्रपती निवडून आणणे भाजपाला शक्य होणार आहे. एखादे सरकार लाटेमध्ये निवडून आले की निवडणुकीनंतर महिना दोन महिने त्या लाटेचा प्रभाव कायम राहतो. परंतु तो हळूहळू ओसरायला लागतो. तशी मोदींची लाट ओसरायला लागेल आणि २०१९ सालची लोकसभेची निवडणूक मोदींसाठी अवघड होऊन बसेल असे अनेक मोदीविरोधकांचे अंदाज होते. मात्र पंजाब वगळता बाकी चार राज्यात मोदी लाट अजून ओसरलेली नाही याचा प्रत्यय आला. उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडात तर ती लाट अधिक तीव्र झाल्याचे लक्षात आले आणि आता हेच मोदी विरोधक २०१९ ची लोकसभा निवडणूक मोदींसाठी फार अवघड नसेल असा निर्वाळा द्यायला लागले आहेत.

●●●

न्यायस्वातंत्र्य समता हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक रमेश अभिमन्यू शेळके यांनी यश एन्टरप्राईजेस डी १४ साई सयाजीनगर वारजे, पुणे-४११ ०५८ येथे छापून सर्व्हे नं.४/१२ महात्मा फुले वसाहत कोंढवा खुर्द, कमेला पुणे-४११ ०४८ येथून प्रकाशित केले.

● (या अंकामध्ये छापलेल्या मजकुरांशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. वादविवाद पुणे न्यायकक्षेत)

जंगली महाराज रस्ता ठरणार जलपुनर्भरणाचे मॉडेल

पुणे (प्रतिनिधी) : शहरातील रस्त्यांवर साठणाऱ्या पाण्याचे महापालिकेकडून जलपुनर्भरण (रेन वॉटर हार्वेस्टिंग) प्रकल्प राबविला जाणार आहे. त्याची सुरुवात जंगली महाराज रस्त्यापासून केली जाणार आहे. त्यासाठी बोअरवेल प्रशासनाकडून या रस्त्याच्या परिसरात घेण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. महापालिकेकडून अशा प्रकारचा प्रायोगिक प्रकल्प कोथरूड मधील लोकमान्य नगर मधील अंतर्गत सिमेंटच्या रस्त्यांसाठी राबविण्यात आला होता.

त्यानंतर आता जंगली महाराज रस्ता, फर्गुसन रस्ता आणि त्यांनतर बालगंधर्व चौक ते महापालिकाभवना पर्यंतच्या काँग्रेस हाऊस समोरील रस्त्यावर हा प्रकल्प राबविला जाणार असल्याची माहिती महापालिकेच्य पथ विभागाकडून देण्यात आली.

जंगली महाराज रस्ता मॉडेल रोड म्हणून विकसित करण्याचे काम महापालिका प्रशासनाकडून हाती घेण्यात आले असून त्या अंतर्गत हा रेनवॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प उभारला जाणार आहे.

शहरात मोठया प्रमाणात सिमेंटचे रस्ते तयार करण्यात आले आहेत. तसेच शहराच्या भौगोलिक रचनेमुळे शहरात पडणाऱ्या पावसाचे पाणी काही प्रमुख रस्त्यांच्या परिसरात मोठया प्रमाणात साचते.

हे पाणी महापालिकेकडून पावसाळी जलवाहिन्यांच्या माध्यमातून नदीत सोडले जाते. मात्र, आता पालिकेकडून रस्त्यांसाठी रेनवॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प राबवून हे पाणी पुन्हा भूगर्भात जिरविले जाणार आहे. सर्वसाधारणपणे भूगर्भात एक लिटर पाणी जमीनीत मुरण्यासाठी कित्येक वर्षे लागतात.

मात्र, रेन वॉटर हार्वेस्टिंग मुळे लाखो लीटर पाणी अवघ्या एका मिनिटात भूगर्भात पोहचणार असून त्यामुळे भूगर्भातील पाणी पातळी वाढण्यास मदत होणार आहे.

असा असेल प्रकल्प

जंगली महाराज रस्त्यावर सुमारे १.९ किलोमीटर अंतराच्या परिसरात साठणारे पावसाचे पाणी या प्रकल्पाच्या माध्यमातून संकलीत केले जाणार आहे. त्यासाठी या रस्त्यांच्या परिसरात तीन ठिकाणी बोअरवेल घेण्यात आल्या असून हे पावसाचे पाणी पाच रेन वॉटर हार्वेस्टिंग पिट्सच्या माध्यमातून पाच ठिकाणी फिल्टर टाक्यांमध्ये साठविले जाईल. या टाक्यांना स्वतंत्र पाईप जोडण्यात आले असून या पाईपच्या माध्यमातून पाणी साठताच ते थेट बोअरवेल मध्ये सोडले जाईल. त्यामुळे पावसाळ्यात लाखो लीटर पाणी भूगर्भात सोडले जाईल. या शिवाय या बोअरवेलचे पाणी या रस्त्यांच्या कडेने उभारल्या जाणाऱ्या उद्यानांसाठी वापरले जाणार असून त्यासाठी पूर्णतः ड्रीप ईरिगेशन यंत्रणा उभारली जाणार आहे. त्यामुळे या उद्यानासाठी लागणारे पाणीही उपलब्ध होणार आहे.

रामदास स्वामी हे कवी म्हणूनही समर्थ : डॉ. समीता टिल्लू

पुणे (प्रतिनधी) : 'आरती, श्लोक, कविता, सवाया, ओव्या लिहिणारे आणि त्यातून सुभाषितवजा जीवनतत्त्वज्ञाची पाखरण करणारे रामदास स्वामी हे कवी म्हणूनदेखील समर्थ होते' असे मत संत साहित्याचे अभ्यासक डॉ. समीता टिल्लू यांनी केले.

'रसिक मित्र मंडळ' च्या 'एक कवी -एक भाषा' या मासिक व्याख्यानमालेत शुक्रवारी सायंकाळी ४७ वे व्याख्यान देताना त्या बोलत होत्या. पुणे श्रमिक पत्रकार संघात हे व्याख्यान झाले. त्याला रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

डॉ. समीता टिल्लू म्हणाल्या की, रामदास स्वामी हे आत्मसाक्षात्कारी संत होते. त्यांनी कविता, श्लोक, सवाया, आरत्या, ओव्या, लावणीही लिहिली. युद्धकांड, सुंदरकांड लिहिले. त्यांच्या लिखाणातून सुभाषितवजा जीवन तत्वज्ञानाची पाखरण झाली. काव्य आणि तत्त्वज्ञान हातात हात घालून चालताना त्यांच्या काव्यातून दिसते. ते कवी म्हणून समर्थ होते.

'राखावी बहुतांची अंतरे', 'मरणाचे स्मरण असावे,' 'मरावे परी कीर्ती रुपी उरावे' अशा सुभाषितवजा ओळींपासून 'सुखकर्ता दुखहर्ता', 'लवथवती विक्राळा'सारख्या ६१ आरत्या लिहिल्या. करुणाष्टके लिहिली. लोकशिक्षण केले आणि जीवनदृष्टीही दिली. ही जीवनदृष्टी ३५० वर्षानंतरही उपयोगी पडते.

अद्वैत-वेदांत तत्त्वज्ञान समर्थांच्या लिखाणात आढळते आणि रसांचा परिपोषही दिसतो. 'कवी म्हणजे शब्दसृष्टीचे ईश्वर' हे त्यांचे शब्द त्यांनीच खरे केले, असेही डॉ. समीता टिल्लू यांनी व्याख्यानात सांगितले.

रसिक मित्रमंडळाचे अध्यक्ष सुरेशचंद्र सुरतवाला यांच्या हस्ते डॉ. समीता टिल्लू यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. प्रकाश कामत यांनी प्रास्तविक केले.

शिवली गावात सुवर्ण महोत्सवी सव्वा महिना ज्ञानसत्र सप्ताह उत्साहात

पिंपरी (प्रतिनिधी) : मावळातील शिवली गावाने सुवर्ण महोत्सवी सव्वा महिना ज्ञानसत्र सप्ताहाचे आयोजन केले आहे. धार्मिक व सांप्रदायिक परंपरा संस्कृतीचे जतन करून गावात सामाजिक सलोखा व एकात्मता राखत त्याची कायम मुहूर्तमोढ रोवली गेली आहे. सध्याच्या धावपळीच्या व वाढत्या चंगळवादी युगात सव्वा महिना अखंड हरिनाम सप्ताहाचे यशस्वी आयोजन करणाऱ्या शिवली गाव व ग्रामस्थांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

सव्वा महिना सप्ताहात रोज सकाळी साडेसात वाजता विष्णूसहस्त्रनाम, सकाळी ८ ते दुपारी १२ अखंड हरिनाम पारायण, दुपारी १२ ते १ भोजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ७ ते ९ किर्तन, रात्री ९ ते १० भोजन व त्यानंतर पहाटे ४ पर्यंत हरिनाम जागर आणि पहाटे ४ ते ६ काकडाआरती भजन अशाप्रकारे दैंनंदिनी हरिनाम नित्यपाठाचे आयोजन करण्यात आले आहे. रोज शिवली व पंचक्रोशी आणि मावळातील अनेक वारकरी व भाविक या हरिनामाचा लाभ घेत असून, रोज २ ते अडीच क्विंटलचे अन्नदान व महाप्रसादाचे वाटप करण्यात येत आहे.

सध्या युवापिढी ही आपल्या परंपरा आणि संस्कृतीपासून वेगळ्या मार्गावर भरकटत चाललेली आहे. सध्याच्या व भावी युवापिढीला सामाजिक, शैक्षणिक, कलाक्रीडा आणि सांप्रदायिक व धार्मिक परंपरा व संस्कृतीची आवड व्हावी तसेच त्यांच्याकडून अशाप्रकारच्या विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन व्हावे आणि त्या माध्यमातून सुसंवाद, वैचारिक मंथन, सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता साधावी यासह हरिनामाची रुची निर्माण व्हावी. हाच मुख्य हेतू असल्याचे शिवली ग्रामस्थांनी सांगितले आहे.

या सप्ताहला ११ फेब्रुवारीला ढोल-ताशांच्या निनादात व टाळ मृदूंगाच्या गजरात दिंडीची भव्य मिरवणूक काढून सुरुवात झाली. या दिवसांपासून गावात घरोघरी गुढी उभारण्यात आली आहे. २१ मार्चला ग्रामदैवत श्री. भैरवनाथ महाराज यांच्या यात्रेच्या दिवशी काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे.

महाराष्ट्राला भिकारी बनवणाऱ्या आमदाराकडे आहे ऐवढी संपत्ती

मुंबई प्रतिनिधी : मी महाराष्ट्राला भिकारी बनवेन, पण मी भिकारी होणार नाही, असे वक्तव्य करुन चर्चेत आलेले शिवसेनेचे यवतमाळचे विधानपरिषदेचे आमदार तानाजी सावंत यांनी बिनशर्त माफी मागितली आहे. जिल्हा परिषद आणि मनपा निवडणुकीच्या प्रचारदरम्यान तानाजी सावंत यांनी हे वादग्रस्त वक्तव्य केले. मी महाराष्ट्राला एकवेळ भिकारी बनवेन, पण मी भिकारी होणार नाही, असे वक्तव्य सावंत यांनी केल्याचा दावा एका व्हिडीओ क्लिपद्वारे करण्यात येत आहे. सध्या सोशल मीडियावर हा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. आणि यावरून तानाजी सावंत यांची संपत्ती किती ही देखील चर्चेचा विषय बनला आहे.

सावंत हे सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील वाकावचे रहिवाशी असून त्यांचे शिक्षण पुण्यात झाले. जेएसपीएम नावांनी पुण्यात चार शैक्षणीक संकुल त्यांची आहेत. ते चार खाजगी साखर कारखान्याचे मालक असून उस्मानाबाद जिल्ह्यात सोनारी येथे खाजगी कारखाना आहे. त्यांनी उस्मानाबादच्या वाशी सह. कारखाना चालवायला घेतला आहे. सोलापर जिल्ह्यात लुंगी आणि विहाळ येथेही त्यांचा कारखाना आहे. त्यांनी वर्षभरापूर्वी शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यांचे भाऊ शिवाजी सावंत सोलापूर जिल्हा परिषदेचे शिवसेनेचे सदस्य होते. पक्षात येताच शिवसेनेने यवतमाळ येथून विधानपरिषदेची उमेदवारी दिली. निवडणुकीच्या शपथपत्रात तानाजी सावंत यांनी ११५ कोटीची संपत्ती जाहीर केली आहे. सर्वाधिक संपत्ती जाहीर केलेल्या पहिल्या तीन आमदारांमध्ये तानाजी सावंत यांचा नंबर आहे.

येथे झाले होते पहिले होलीकादहन

बिहार : होळी पोर्णिमेला होळी पेटविण्याची परंपरा भारतात सर्वत्र असली तरी त्याची सुरवात मात्र बिहारमधील पूर्णिया जिल्ह्यातील सिकलीगढ धरहरा या गावापासून झाल्याचे अनेक संदर्भ श्रुती तसेच पुराणातून मिळतात. आजही मोठ्या संख्येने म्हणजे ५० हजारांपेक्षा जास्त श्रद्धाळू येथे येऊन राख आणि मातीने होळी साजरी करतात.

पुराणातील उल्लेखांप्रमाणे विष्णुचा चौथा अवतार नरसिंह धरहरा येथे झाला. सिकलीगढ हा हिरण्यकश्यपूचा किल्ला होता. हिरण्यकश्यपूचा मुलगा प्रल्हाद विष्णुचा भक्त होता व त्यामुळे हिरण्यकश्यपू चिडलेला असे. त्याने प्रल्हादाला तुझा देव या खांबात आहे काय असे विचारताच प्रल्हादाने होय असे उत्तर दिले होते व त्यावर हिरण्यकश्यपूने खांबाला लाथ मारून तो पाडला तेव्हा त्यातून अक्राळविक्राळ नरसिंह बाहेर आला व त्याने हिरण्यकश्यपूचा वध केला ही कथा आपण जाणतो. नरसिंह बाहेर पडला तो माणिक्य स्तंभ येथे आजही पाहायला मिळतो. १२ फूट रूंदीचा व ६५ अंशात झुकलेला हा प्रचंड खांब आहे.

धरहरा येथेच होलिकाने प्रल्हादाला घेऊन आगीत बैठक मारली होती मात्र त्यात होलिका पूर्ण जळाली पण प्रल्हाद मात्र सुखरूप बाहेर आला. तेव्हापासून येथे होलिका दहनाची परंपरा पाळली जाते. त्यानंतर लोकांनी याच राखेचे व मातीचे मिश्रण करून होळी खेळली म्हणजेच राख व माती एकमेकांना लावली व त्यातून ही परंपरा सुरू झाली. गोरखपूरच्या गीता प्रेस च्या भागवत पुराणातही माणिक्य स्तंभाचे उल्लेख आहेत.

'बुवां'च्या राजकीय कारकिर्दीला सुरुंग?

दिल्ली : उत्तरप्रदेशात विधानसभा निवडणुकीच्या निकालात हाती आलेल्या मतमोजणीच्या आकड्यांनुसार, बहुजन समाज पार्टी मागे पडल्याचे चित्र आहे. मायावतींच्या राजकीय कारकिर्दीसाठी बसपाचा हा पराभव अत्यंत धोकादायक ठरू शकतो. पाच वर्ष सत्तेच्या खूर्चीपासून दूर राहिल्यानंतरही या निवडणुकीत मायावतींनी कुणासोबत युती करणे टाळले होते.

राजकीय विश्लेषकांच्या मते, विधानसभा निवडणुकीतील या पराभवानंतर बसपामधील कार्यकर्ते पक्ष सोडून जाण्याचा धोका आहे. या अगोदरच पक्षाला आर के चौधरी, स्वामी प्रसाद मौर्य आणि ब्रजेश पाठक सहीत अनेक नेत्यांनी रामराम ठोकला आहे. यानंतर विरोधी पक्षांना मायावतींना आणि सपाला आपल्या निशाण्यावर घेणे सहज शक्य होणार आहे.

दलित आणि मुस्लिमांवर मायावती यांनी विश्वास ठेवला. यूपीमध्ये ४० टक्के दलित मतदार आहेत. परंतु २०१४ मध्ये भाजपने दलित मतदारांना मोठ्या प्रमाणावर आकर्षित केल्यामुळे दलितांकडे पर्याय म्हणून भाजप पक्षाची भर पडली. या निवडणुकीत ९७ मुस्लिम उमेदवारांना मायावती यांनी तिकीट दिले. त्यामुळे दलित आणि सवर्ण मते बसपपासून दूर गेली. मायावती यांनी मुस्लिम मतदारांना आकर्षित करण्यासाठी मुख्तार अन्सारी यांना पार्टीमध्ये घेतले. परंतु बेनी प्रसाद वर्मा यांना घेतले नाही. याचा फटका बसला.

१९८४ साली बहुजन समाज पार्टी अस्तित्वात आली होती. परंतु, या पक्षाला सत्तेत येण्यासाठी ११ वर्ष लागली. मुलायम सिंह यांच्यासोबत पहिल्यांदा या पक्षाने हातमिळवणी करत सत्ता मिळवली. त्यानंतर १९९५मध्ये मुलायम सिंह यांच्या पक्षाची सत्ता उलथवून टाकत मायावती पहिल्यांदा मुख्यमंत्री बनल्या. त्यानंतर बसपाचे राजकारण मायावतींच्या आसपास फिरत राहिले.

छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात सीआरपीएफचे ११ जवान शहीद

बिलासपूर : एकीकडे देशात पाच राज्यातील निकालामुळे आनंदाचे वातावरण आहे तर दुसरीकडे छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात नक्षलवादी हल्ल्यात ११ सीआरपीएफ जवान शहीद झाले आहेत. भेज्री परिसरात आज सकाळी सीआरपीएफ आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. सर्व शहीद जवान सीआरपीएफच्या २१९ व्या बटालियनचे होते. रस्ते निर्माण सुरक्षेसाठी असलेल्या जवानांना निशाणा साधत नक्षलवाद्यांनी सुरुवातीला आयईडी ब्लास्ट केला, त्यानंतर अंदाधुंद गोळीबार केला. यावेळी ९ जवानांचा जागीच मृत्यू झाला. तर दोन जवानांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. इतकेच नाही तर नक्षलवाद्यांनी जवानांची हत्यारे, रेडिओ सेट आणि इतर सामान लूटले असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुकमामधील शहीद जवानांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करत शोक व्यक्त केला आहे. तसेच जखमी जवानांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा होण्यासाठी प्रार्थना केली. तसेच गृहमंत्री राजनाथ सिंह यांच्याशी बातचीत करुन सुकमामधील परिस्थितीचा आढावा घेण्याचे आश्वासन दिले आहे.

एअर इंडिया'ने लाखो कोटींचा तोटा दडविल्याचा 'कॅग'चा ठपका

दिल्ली : भारत सरकारचा उपक्रम असलेल्या 'एअर इंडिया'ने मार्च २०१५ पर्यंतच्या ३ वर्षाच्या कार्यकाळात तब्बल १०० कोटी डॉलर्स; अर्थात ६ लाख ६४ हजार ९५० कोटी रुपयांचा तोटा दडविल्याचा ठपका नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) ने ठेवला आहे.

या अहवालाने 'एअर इंडिया'च्या आर्थिक दु:स्थितीला अधोरेखित केले आहे. प्रामुख्याने अनावश्यक नोकरभरती आणि अनुत्पादक मालमत्तांच्या विक्रीकडे करण्यात आलेले दुर्लक्ष यामुळे ही परिस्थिती ओढविली असल्याचे कॅगच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

सन २०१२ मध्ये खाजगी प्रवासी विमान वाहतूक कंपन्यांशी; प्रामुख्याने स्वस्त दरात हवाई सफर घडविणाऱ्या कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी ४१ लाख ८९ हजार १८५ कोटी रुपयांच्या शासकीय देण्यातून 'एअर इंडिया'ला सूट देण्यात आली होती. मात्र या दिलाशानंतरही आर्थिक गर्तेतून बाहेर पडण्यात 'एअर इंडिया'ला यश आलेले नाही.

सन २०१६ मध्ये एअर इंडियाचा प्रवासी विमान वाहतूक बाजारपेठेतील वाटा १४. ६ टक्के होता; तर इंडिगो एअरलाईन्स या आघाडीच्या कंपनीचा वाटा तब्बल ३९. ३ टक्के आहे.

नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षाच्या अखेरीस 'एअर इंडिया'ची अल्पकालीन कर्ज १ लाख ४५ हजार कोटी ५१ लाख रुपयांवर पोहोचली आहेत. ही रक्कम शासनाने निर्धारित केलेल्या कर्ज मर्यादेच्या चौपट अधिक असल्याचेही कॅगच्या अहवालात निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

'एअर इंडिया'ने आपल्या अनुत्पादक मालमत्तांची त्वरित विक्री करून कर्जमुक्तीला वेग द्यावा आणि विमानसेवेतील आपली कामगिरी सुधारण्यासाठी छोटी विमाने भाड्याने घेऊन आपल्या सेवेची व्याप्ती वाढवावी; असे कॅगने आपल्या अहवालात सुचविले आहे.

मोदी हे स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वाधिक लोकप्रिय नेते: अमित शहा

चारही राज्यात सरकार स्थापनेचाही दावा

दिल्ली : चार राज्यातील विधानसभा निवडणूक निकालांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वात लोकप्रिय नेते असल्याचे दाखवून दिले आहे; असा दावा भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष अमित शहा यांनी केला आहे. उत्तरप्रदेश, उत्तराखंडसह गोवा आणि मणिपूरमध्येही भाजप सरकार स्थापन करेल; असेही ते म्हणाले.

उत्तरप्रदेश निवडणुकीत स्पष्ट बहुमत प्राप्त केल्यानंतर येथील पक्ष मुख्यालयात शेकडो कार्यकर्त्यांनी शहा यांचे स्वागत केले. उत्तरप्रदेशच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ४०३ पैकी ३२० जागांवर विजय प्राप्त केला आहे. अन्य सर्व पक्षांना मिळून १०० पेक्षा कमी जागांवर समाधान मानावे लागले आहे.

उत्तराखंडातही पक्षाने स्पष्ट बहुमत प्राप्त केले आहे. गोवा आणि मणिपूरमध्ये भात आणि काँग्रेसची सरळ लढत झाली असून या राज्यात कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. त्यामुळे इतरांच्या मदतीने या राज्यात सरकार स्थापन करण्याचा भाजपचा प्रयत्न असणार आहे.

या निवडणुकात भाजपाला मिळालेला विजय हा मोदी यांच्या नेतृत्वाचा विजय आहे. या निकालांनी देशाच्या राजकारणाला एक वेगळे, विधायक वळण मिळेल; असे शहा यांनी नमूद केले.

या राज्यातील निकालांचे श्रेय केंद्रीय मंत्री रविशंकर प्रसाद यांनी मोदी यांच्या करिष्म्यासह अमित शहा यांनाही दिले. मोदी लाटेचे रूपांतर आता 'त्सुनामी'मध्ये होत असल्याचे ते म्हणाले. शहा यांनी निवडणुकीत विजय प्राप्त करण्यासाठी अथक प्रयत्न केल्याचेही त्यांनी नमूद केले.